CMYK

बीड । रविवार

०४.०५.२०२५

वर्षे : ५ अंक : ३३

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# हा राजकीय मंच नाही, सगळेच माजी मुख्यमंत्री आले असते तर आनंद झाला असता : मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे माजी मुख्यमंत्र्यांच्या सन्मान सोहळा आयोजीत केला आहे. या सोहळ्याला माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्यासह नारायण राणे आणि विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (ऊर्शीशपवीर ऋवपर्रींळी) उपस्थित होते. सगळेच माजी मुख्यमंत्री आले असते तर आनंद झाला असता. कारण हा राजकीय मंच नाही. जरी हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा कार्यक्रम असला तरी हा गौरवशाली महाराष्ट्राचा सत्कार होता असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. त्यामुळं जे आले त्यांचा सत्कार आहे, जे



नाही आले त्यांचा मनातून सत्कार आहे असे फडणवीस म्हणाले.

**● शक्ती आणि भक्तीचा इतिहास इथं पाहायला मिळत आहे**

गौरवशाली महाराष्ट्र हा कार्यक्रम राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आयोजित केला आहे. इथं जी दालनं तयार केली आहेत ती अतिशय सुंदर आहेत. महाराष्ट्रातील प्रत्येकाने बघावी अशी ही दालन आहेत. शक्ती आणि भक्तीचा इतिहास इथं पाहायला मिळत आहे. राज्यातील थोर पुरुष संयुक्त महाराष्ट्र लढा, विविध पुरस्कार प्राप्त रत्न असा सगळा राज्याचा इतिहास इथ मांडला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. मला आधी माहिती असतं की इथ खाद्यचे स्टॉल आहेत तर एक तास आधी मी आलो असतो. मी म्हणत असतो मी पुन्हा येईल. तर मी परत आलो असतो असेही फडणवीस म्हणाले.

**● प्रत्येक मुख्यमंत्र्यांचा राज्याच्या जडणघडणीत हात**

मुंबई महाराष्ट्राला सहज मिळेल असे वाटत नव्हतं १०६ हुतात्म्यांनामुळे मुंबई महाराष्ट्राला मिळाली. त्यावेळी विदर्भातील नेत्यांनी एकमुखी निर्णय घेतला. आपली मराठी टिकवायची असेल तर आपण एक व्हायला हवं आणि त्यानुसार सगळेजण एकत्र आले आणि संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला असे फडणवीस म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेसने आजी माजी मुख्यमंत्र्यांचा सत्कार करण्याचा निर्णय घेतला, हे स्वागतर्ह आहे. प्रत्येक मुख्यमंत्र्यांचा राज्याच्या जडणघडणीत हात आहे. त्यामुळं त्यांचा सन्मान होणं अतिशय चांगलं आहे. मी तीन वेळा मुख्यमंत्री झालो. एकदा ७२ तास मुख्यमंत्री झालो त्यावेळी अजित पवार देखील ७२ तास उपमुख्यमंत्री झाले. आमच्या दोघांच्या नावावर सर्वात कमी कालावधीचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री होण्याच रेकॉर्ड असल्याचे फडणवीस म्हणाले.

## बीडमध्ये हवालदाराचा कारनामा

### आधी लाच घेताना पकडला, आता वाळू माफियाला पळवून लावले

**बीड । प्रतिनिधी**

ऑक्टोबर २०२४ मध्ये वाळूचे ट्रॅक्टर सोडण्यासाठी पाच हजार रूपयांची लाच घेताना जालना एसीबीच्या जाळ्यात अडकला. निलंबनानंतर पुन्हा रूजू होताच त्याच हवालदाराने पुन्हा एकदा वाळू माफियाला पळून जाण्यासाठी मदत केली. हा प्रकार लक्षात येताच त्याला सह आरोपी करून बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. शनिवारी हा प्रकार घडला.




आता त्याचे पुन्हा एकदा निलंबन केले होणार आहे. रामप्रसाद शिवनाथ कडूळे (वय ३६) असे आरोपी हवालदाचे नाव असून सध्या तो पोलिस मुख्यालयात आहे. ७ एप्रिल २०२५ रोजी रात्री ९ वाजता नाथापूर शिवारातील सिंदफना नदीपात्रातून अवैध वाळू उपसा केला जात होता. ही माहिती मिळताच परिविक्षाधिन उपअधीक्षक पुजा पवार यांनी पथक ▶▶ उर्वरित पान २ वर

## दोन रुपयांची किंमत काय? २० वर्षे लढा दिला अन् सुप्रीम कोर्टाने केलं निर्दोष मुक्त; नेमकं काय घडलं..

**मुंबई । प्रतिनिधी**

आज दोन रुपयांत काय मिळतं. चहा सुद्धा नाही. या दोन रुपयांची किंमत सर्वसामान्यांच्या लेखी शून्यच. पण, याच दोन रुपयांच्या कारणासाठी एक व्यक्ती तब्बल २० वर्षे कोर्टाच्या चकरा मारत राहिला. या व्यक्तीचं नाव आहे अमन भाटिया ग्राहकाकडून दोन रुपये जास्तीचे मागितले असा त्यांच्यावर आरोप होता. परंतु, हा आरोप काही सिद्ध झाला नाही. सुनावणीनंतर सर्वोच्च न्यायालयाने तब्बल वीस वर्षांनंतर अमन



भाटिया यांना या आरोपांतून मुक्त केले. भाटिया दिल्लीतील जनकपुरी येथे स्टँप विक्रीचे काम करत होते. २००३ चं वर्ष होतं. तारीख होती ९ डिसेंबर. एक ग्राहक त्यांच्याकडे दहा रुपयांचा स्टँप पेपर खरेदी करण्यासाठी आला. पण, अमन भाटिया यांनी त्याच्याकडे १२ रुपये मागितले असा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला. लाचेचाच हा प्रकार असे समजून त्या ग्राहकाने भाटिया यांच्याविरुद्ध अँटी करप्शन विभागात तक्रार दाखल केली. यानंतर सापळा रचून अमन भाटिया यांना रंगेहाथ पकडण्याचा प्रयत्न करण्यात आला. नंतर प्रकरण कोर्टात पोहोचलं. खालच्या न्यायालयाने या प्रकरणात एक वर्षाची शिक्षा सुनावली. उच्च न्यायालयाने २०१४ मध्ये या निर्णयाला कायम ठेवले. ▶▶ उर्वरित पान २ वर



*अंबेजोगाई: येथे भावी आमदार प्रा. ईश्वर मुंडे यांच्या निवासस्थानी दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे यांनी भेट दिली असता त्यांचा सत्कार करण्यात आला व अनेक विविध सामाजिक, राजकीय विषयावर चर्चा केली. प्रा.ईश्वर मुंडे हे लवकर राजकीय समीकरण बदलणार असल्याचे यावेळी दिसून आले.*

## मंगरूळ परिसरामध्ये बिबट्याचा वावर

**आष्टी । प्रतिनिधी**

मंगरूळ परिसरातील मोठ्या प्रमाणावर बागायती क्षेत्र असल्याने ऊसाची लागवड आहे. पिकाचा आधार घेत बिबट्या दडण धरुन या तीन दिवसापासून वावर असून अनेक श्वानाचा फाडशा पाडला आहे. वनविभागाने याची दखल घेत घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता, बिबट्याचे ठसे व शेतात बिबट्याचे केस वनविभागाला आढळून आले आहेत. बिबट प्राणी असल्याचा दावा वनविभागाने केला आहे. यामुळे नागरीकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.



आष्टी तालुक्यातील मंगरूळ परिसरात बागायती क्षेत्र असल्याने येथील शेतकरी उसाची लागवड मोठ्या प्रमाणावर केली आहे. या उसाच्या पिकाचा आधार घेऊन बिबट्याने सुरेश दिंडे यांच्या शेतात मुक्काम ठोकला या ठिकाणी बिबट्याचे वनविभागाला ठसे व केस देखील आढळून आले आहेत बिबट्याने परिसरातील अनेक श्वानाचा फाडशा पाडल्याचे देखील शतकऱ्यांनी सांगितले आहे. शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. श्वानाची शिकार करताना एखाद्या बळी जाऊ नय यासाठी (shti) वनविभागाने तात्काळ उपाययोजना करावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. घटनेची माहिती कळताच वन परिक्षेत्र अधिकारी संजय ढगे यांच्या आदेशावरून वनरक्षक अशोक काळे, वनरक्षक बाबासाहेब शिंदे, वनरक्षक किरण पंदलवाड, वन कर्मचारी युनूस शेख, मोरे, वनपाल जायभाय आर्दीनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली आहे

## वंजारवाडीच्या मयत वारसांना आणि जखमींना अर्थसहाय्य मंजूर करावे.. मुख्यमंत्र्यांकडे आ.सुरेश धस यांची मागणी

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील मजूर महिला पुरुष आणि बालकांसह वंजारवाडी येथून कडा येथे जात असताना सकाळी १०.५० या वेळी देवीनिमगाव या गावाजवळ हे पिकअप वाहन टायर फुटल्याने उलटले दोन तीन पलटया झाल्या या अपघातामध्ये अजित विठ्ठल महाजन वय १४ वर्षे, कु.श्रावणी विक्रम महाजन वय १३ वर्षे, आणि कु.ऋतुजा सतीश महाजन वय १६ वर्षे यांना जबर मार लागल्याने ते मयत झाले तर २० जखमी झाले. कामगार दिनी रस्ता अपघातामध्ये मयत झालेल्या ३ मजुरांच्या वारस कुटुंबियांना आणि जखमी मजुरांना मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधी द्वारे अर्थसाह्य मंजूर करावे अशी मागणी पत्राद्वारे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आष्टी,पाटोदा,शिरूर



मतदारसंघाचे आ.सुरेश धस यांनी केली आहे. आष्टी विधानसभा मतदारसंघातील.. वंजारवाडी ता.आष्टी जि.बीड येथील महिला, पुरुष हे मजूर दि.१ मे २०२५ रोजी आपल्या मुलांसह कांदा भरण्यासाठी श्री. दिलीप विलास महाजन यांच्या पिकअप वाहन क्र.एम.एच.-१- एल- २६८५ या वाहनाद्वारे..वंजारवाडी येथून कडा येथे जात असताना सकाळी १०.५० या वेळी देवी निमगाव या ▶▶ उर्वरित पान २ वर




# मुख्याधिकारी नीता अंधारे यांच्या कार्यकाळात नगरपालिकेत अंधारच अंधार !

### पाण्यासाठी शहरातील नागरिकांना भटकंती करण्याची वेळ : वर्षाताई जगदाळे

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधा पुरवण्याची जबाबदारी असणाऱ्या बीड नगरपालिकेच्या मुख्य अधिकारी नेता अंधारे यांनी तुघलकी कारभार सुरू केला आहे का? शहरातील नागरिकांना २५ दिवसाला पिण्याचे पाणी येत नसल्याने याचा जाब विचारण्यासाठी



नगरपालिकेत गेलेल्या मनसेच्या राज्य उपाध्यक्ष वर्षा जगदाळे यांना आपली जबाबदारी पाण्याची नसल्याचे सांगत हात वर करणाऱ्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांची तात्काळ बीड मधून निलंबित करत हकलपट्टी करण्याची मागणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे करणार असल्याचे वर्षाताई जगदाळे यांनी म्हटले असून बीड नगरपालिकेचा कारभार नीता अंधारे यांच्या कार्यकाळात दयनीय झाला आहे. शहरात साचलेले कचऱ्याचे ढीगारे पसरलेली रोगराई रात्रीच्या वेळी मुख्य ठिकाणी असलेले पथदिवे बंद यासह शहरात मोकाट जनावरांचा वावर तुंबलेल्या नाल्या यासह शहरातील ▶▶ उर्वरित पान २ वर

## लॉयन अशोक मिश्रा यांना उत्कृष्ट अध्यक्ष रजत पुरस्कार



**जालना । प्रतिनिधी**

लायन्स क्लब जालना गोल्ड क्लबचे अध्यक्ष अशोक मिश्रा यांना क्लब तर्फे राबविण्यात आलेल्या, महिला बाल रुग्णालय येथे गेल्या सहा (६) वर्षापासून मोफत भोजन (जेवण), शालेय विद्यार्थ्यांना वह्या वाटप इन वाटप ड्रेस वाटप, थंडीपासून वाचण्याकरिता ४०० ब्लँकेट वाटप करण्यात आला, गरजू महिलांना साड्या वाटप करण्यात आल्या असे अनेक प्रकल्प राबविण्यात आले ,याची समाज उपयोगी दखल घेत लॉयन्स प्रांत ३२३४ क२ अंतर्गत एकदंत ▶▶ उर्वरित पान २ वर

CMYK

# मुलांच्या सुट्टीचा सदुपयोग करा !



समस्त शाळकरी मुलांच्या वार्षिक परीक्षा संपून आता उन्हाळी सुट्टी पडली आहे. शहरी भागांत लहान मुलांना एरव्ही शाळेत सोडले की गृहिणींना घरातील कामे करण्यास मोकळा वेळ मिळत असे. आता मात्र संपूर्ण दिवस मुले घरी असल्याने त्यांना काय हवे आणि काय नको याची पूर्तता करण्यामध्ये त्यांची पुरती दम छाक होत आहे. ज्यांची गावाला घरे आहेत ती कुटुंबे दरवर्षी गावाला जातात; मात्र ज्यांची नाहीत त्यांना मात्र या दिवसांत मुलांचे लाड पुरवण्याखेरीज अन्य पर्याय नसतो. यंदा उन्हाचा तडाखा खूपच असल्याने दुपारी मुलांना घराबाहेर खेळायलाही पाठवता येत नाही अशावेळी घरी त्यांचे हट्ट पुरवण्याचा त्रास नको म्हणून काही गृहिणी आपले मोबाईल मुलांच्या स्वाधीन करतात किंवा घरातील टीव्ही चालू करून देतात. त्यावर ही मुले दिवसदिवसभर गेम्स खेळत असतात किंवा रिल्स बघत असतात. मुलांची ग्रहणक्षमता अधिक असल्याने ते जे पाहतात त्याचा परिणाम त्यांच्या कोवळ्या मनावर पटकन होतो. इंटरनेट विश्वात अनेक हिंसक गेम्सही आहेत. हे गेम्स पाहून तशा कृती ही मुले करण्याचा प्रयत्न करतात, गेम्समधील आभासी पात्रांना ते आपले आदर्श मानू लागतात. सातत्याने गेम्स पाहणारी मुले अधिक हिंसक किंवा भित्री होत असल्याचे मानसोपचार तज्ज्ञांनी संशोधनातून सिद्ध केले आहे. कार्टून्स पाहून ते तशाच प्रकारच्या हालचाली करू लागतात. हल्ली रिल्स बनवण्यावर कोणतेही बंधन नसल्याने रिल्स पाहता पाहता अनेकदा अश्लील किंवा शिव्यांचा मुक्त वापर असलेल्या रिल्स अचानकपणे मोबाईलवर येतात. अशावेळी मुलांच्या हाती मोबाईल सोपवणाऱ्या पालकांचीही पंचाईत होते याखेरीज मुलांच्या कोवळ्या डोळ्यांवर या मोबाईल्स आणि टीव्हीच्या किरणांचा परिणाम होऊन त्यांची दृष्टीक्षमता अल्प होते. एरव्ही शाळा, ट्युशन्स यांच्या व्यापात थोडा थोडका काळ मुलांना मोबाईल वापरायला मिळत असतो, सुट्टीच्या दिवसात मात्र प्रमाणाबाहेर मोबाईलच्या सानिध्यात मुले राहत असल्याने त्याचे विपरीत परिणाम त्यांच्या आरोग्यावर होतात. सुट्टीच्या दिवसांत अनेक राष्ट्रप्रेमी संघटना, मंडळे शालेय मुलांसाठी विविध शिबिरांचे आयोजन करतात. यापैकी बरीच शिबिरे ही विनामूल्य किंवा नाममात्र मूल्य घेऊन भरवली जातात. सुट्टीच्या दिवसांत मुलांना मोबाईल किंवा टीव्हीचा नाद लावण्याऐवजी त्यांना अशा संस्कार, क्रीडा किंवा शौर्य शिबिरांना पाठवायला हवे. त्यासोबतच पालकांनी मुलांसाठी वेळ काढून त्यांच्याकडून श्लोक, स्तोत्र पाठांतर करून घ्यायला हवेत. देवतांचे अवतार, क्रांतिकारक, समाज सुधारक यांच्या कथा आणि जीवन चरित्रे त्यांना सांगायला हवीत. राजमाता जिजाऊ यांनी छत्रपती शिवरायांना लहानपणीच रामायण, महाभारत यांतील शौर्याचे आणि संस्कारांचे धडे दिले. ज्याचा परिणाम म्हणून शिवरायांनी शून्यातून हिंदवी स्वराज्य स्थापन केले. श्याम च्या आईच्या कथा तर आपण सर्वांनीच ऐकल्या आणि वाचल्या असतील. एरव्ही शाळा, शिकवण्या आणि अभ्यासात गुंतलेल्या मुलांवर चांगले संस्कार करण्यासाठी पालकांकडे हाच कालावधी असतो. हा वेळ मुलांना द्या, मुलांच्या सुट्टीचा सदुपयोग करा !

पान ४ वरून पुढे...

## पद्मपाणी राज्य, ...

नाट्यगृहामध्ये मान्यवरांच्या शुभहस्ते थाटात या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास बीड जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिलीप तरकसे यांनी केली आहे. यावर्षीच्या पुरस्कारांमध्ये पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणार्या पत्रकारांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे यामध्ये दै.लोकाशाचे निवासी उपसंपादक उत्तम हजारे, दै. रिपोर्टर बीडचे कार्यकारी संपादक गणेश सावंत, दै. पुढारी न्यूजचे बीड जिल्हा प्रतिनिधी उदय नागरगोजे, दै. लोकनायकच्या सह संपादिका नायरा राज मुळे, दैनिक दिव्य मराठीचे ब्यूरोचिप अमोल मुळे, साप्ताहिक आदर्श पोलखेलचे संपादक नितेश उपाध्ये यांना आदर्श पत्रकारिता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय काम करणार्या समाजसेविक पुरस्कार मुंबई येथील समाजसेवक शाहिरा जाधव, बीड शहरातील ज्येष्ठ समाजसेविका सौ. सीमा ओस्तवाल मॅडम, जिव्हाळा शहरी बेघर निवारा केंद्राचे राजू वंजारे, अभिजित वैद्य, जालना जिल्ह्यातील माधवराव नरसिंहराव पात्रे यांना उत्कृष्ट समाजसेवक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. आपल्या दमदार अभिनयाच्या माध्यमातून रसिकांच्या हृदयावर राज्य करणार्या अभिनेत्री आम्रपाली (स्नेहा) साबळे यांना उत्कृष्ट अभिनेत्री पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. उत्कृष्ट प्रशासकीय अधिकारी पुरस्कारासाठी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके, उपशिक्षणाधिकारी अधिकारी मैना बोराडे मॅडम, वडवणीचे गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे, एअरपोर्ट संभाजीनगरचे पंकज आढाव यांची निवड करण्यात आली आहे. उत्कृष्ट अधिकारी म्हणून बीड जिल्हा परिषद बीड बांधकाम विभागाचे राजेंद्र ओव्हाळ यांच्यासह यांची निवड करण्यात आली. अध्यापनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना घडवण्याचे काम करणार्या शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार दिला जातो. यावर्षीच्या आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी प्राचार्य सुधीर देशमुख (मराठवाडा कॉलेज ऑफ आयटी बीड), भागवत सावंत (उपळी हायस्कूल, उपळी), तालुका वडवणी, अनिता काळे (संस्कार विद्यालय बीड), रामराव विठ्ठल मोरे मोरे (जी. प .शाळा दुकडेगाव केंद्र चिंचाळा तालुका वडवणी), प्रा शशिकांत जावळे (कनिष्ठ महाविद्यालय,शिरूर कासार), वर्षा हिंगेसे (किड्स फॅशन प्री प्रायमरी स्कूल कालिका नगर बीड), देविदास हिरे (नूतन माध्यमिक विद्यालय भाटगाव ता. चांदवड नाशिक), कल्याण घोडके (राष्ट्रीय कनिष्ठ महाविद्यालय बीड), शेख राजू शेख नूर (जि.प.प्रा. शाळा बहीरवाडी ता.जी.बीड), रामचंद्र कसबे मुख्याध्यापक (द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय बीड), राहुल निकाळजे (भैरवनाथ विद्यालय, अमळनेर ता.पाटोदा जिल्हा बीड), आदर्श शाळा पुरस्कार जि.प.उच्च माध्यमिक शाळा जरेवाडी ता. पाटोदा जिल्हा बीड मुख्याध्यापक आजिनाथ गहिनीनाथ सुळे, तर उत्कृष्ट साहित्यिक पुरस्कार गौतम गायकवाड उपप्राचार्य खोलेश्वर महाविद्यालय अंबाजोगाई ता. अंबाजोगाई यांना जाहीर करण्यात आला आहे. पद्मापाणी राष्ट्रीय जीवन गौरव पुरस्कार अमोल जगताप (आवरगाव ग्रामपंचायत कार्यालय आवरगाव तालुका धारूर), पद्मपाणि राजकीय उघोजक पुरस्कार वसंतराव किसनराव गायसमुद्रे वडीगोद्री ता. अंबड जि.जालना यांना मान्यवरांच्या शुभहस्ते हा पुरस्कार दिला जाणारा असून या पुरस्कार वितरण सोहळ्यास बीड जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिलीप तरकसे यांनी केले आहे.

## NEET परीक्षेआधीच ...

एजन्सीमार्फत (NT) घेतली जाणार असून, लातूर जिल्हा प्रशासनाने

पान ४ वरून पुढे...

परीक्षेसाठी जय्यत तयारी केली आहे. जिल्ह्यातील ५१ परीक्षा केंद्रांवर कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. तसेच प्रत्येक परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांसाठी हेल्प डेस्कची स्थापना करण्यात आली आहे.

## माल निघालाय...

२०० पोते कांदा बेंगलोरच्या बाजारात विकला, सध्या ११ रूपये किलो भाव असुन वाहतूक खर्च,आडत, हमाली आदी जाऊन ५-६ रूपये भाव पडत असल्याचे सांगत बारदाणा आणि पिशव्या भरायला परवडत नसल्याची खंत व्यक्त केली. कांद्याचे दर वाढल्यानंतर दर रोखण्यासाठी निर्यातबंदी,कांदा आयात आदींसाठी प्रयत्न करणाऱ्या सरकारने दरवाढ झाल्यावर लक्ष देऊ नये : डॉ.गणेश ढवळे कांद्याचे भाव वाढल्यानंतर शासनाकडून दर रोखण्यासाठी प्रयत्न केले जातात.केंद्रीय पथक येतात,पाहणी करतात, निर्यातबंदी सारखी पावले उचलतात,आयात केली जाते. मात्र कांद्याचे भाव कोसळल्यानंतर मात्र शासन शेतकऱ्यांकडे ढुंकूनही पहात नाही. त्यामुळे भाव वाढल्यानंतर सरकारने लक्ष देऊ नये अशी संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी दिली आहे.

## भक्तांचा सांभाळ...

आपल्या जीवनात नामाची खूप गरज आहे. भगवंताच्या नामस्मरणाने देव आपल्याशी जोडला जातो हे साक्षी दिदींने विविध भक्तांची उदाहाने देऊन सविस्तर कथा भाग विषद केला. कृष्ण जन्म वेळी संपूर्ण कथा मंडप भरला होता. हा कृष्ण जन्म अत्यंत आनंदी व भक्तिमय वातावरणात संपन्न झाला शेवटी मान्यवर मंडळी यांनी भागवत महापुराण ग्रंथाची आरती होऊन प्रसाद वाटप केला

### शिव उपासक महंत ह भ प बाळनाथ महाराज डीसले यांची कथेला भेट

नाम सप्ताह व भागवत कथा हि जीवनातील दुःख व निराशा दूर करून आपल्या जीवनात आनंद व सकारात्मक विचार पेरण्याचे कार्य करते. नामजप व भक्तिमार्ग या साधनेमुळे जीवनात नव चैतन्य निर्माण होते असे बहुमोल विचार भुवनेश्वर संस्थांनाचे शिव उपासक ह भ प महंत बाळनाथ महाराज यांनी व्यक्त करून भागवत कथा प्रवक्ते साक्षीताई चे तोंड भरून कौतुक केले व शुभेच्छा दिल्या.

## आदित्य पॉलिटेक्निकच्या...

तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. अदिती सारडा, आदित्य पॉलिटेक्निक चे प्राचार्य डॉ. राहुल खडके यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी महाविद्यालयाचे पी. डी. दुधाळ, जी. एम. खालापुरीकार, ए.आर. मुंडे, आर.एस. वरपे यांची उपस्थिती होती.

पर्यावरण विज्ञान, स्थापत्य अभियांत्रिकी अभ्यास करणारे विद्यार्थी वर्गात शिकलेल्या सैद्धांतिक संकल्पनांचा व्यावहारिक उपयोग प्रत्यक्षपणे पाहण्यासाठी असा शैक्षणिक अभ्यास भेटीचे आयोजन केले जाते. द्रव यांत्रिकी, सूक्ष्मजीवशास्त्र आणि रासायनिक अभिक्रियांचे तत्व वास्तविक जगात कसे वापरले जातात याची संपूर्ण माहिती या भेटीत विद्यार्थ्यांना मिळाली. सांडपाणी प्रक्रियेमधील आधुनिक आणि कार्यक्षम पद्धतीचा विद्यार्थ्यांनी अभ्यास केला. ज्यामध्ये स्क्रीनिंग, ग्रिट काढून टाकणे, डइठ

पान ४ वरून पुढे...

बेसिनमध्ये जैविक उपचार आणि निर्जंतुकीकरण. सांडपाणी प्रक्रियांचे महत्त्व: जलजन्य रोगांचा प्रसार रोखून सार्वजनिक आरोग्याचे रक्षण करण्यात एसटीपीची महत्त्वाची भूमिका विद्यार्थ्यांनी समजून घेतली. प्रक्रिया न केलेल्या सांडपाण्यामुळे समुदाय आणि परिसंस्थांवर होणारे परिणाम विद्यार्थी समजून घेतले. कांचनवाडी एसटीपीमध्ये दररोज १६१ दशलक्ष लिटर सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याची क्षमता आहे. ज्यामुळे नवी मुंबईतील एसटीपी वगळता ते राज्यातील सर्वात मोठ्या एसटीपींपैकी एक आहे. हे भारत सरकारच्या लघु आणि मध्यम शहरांसाठी शहरी पायाभूत सुविधा विकास योजनेअंतर्गत (णखऊडडचढ) बांधण्यात आले आहे. सध्या, सांडपाणी निर्मिती सुमारे १०७ एमएलडी आहे. पंपिंग स्टेशनमधील कच्चे सांडपाणी इनलेट चेंबरमध्ये आणले जाते.नंतर ते मोठे घन पदार्थ काढून टाकण्यासाठी यांत्रिक स्क्रीनमधून जाते. स्क्रीनिंगनंतर, सांडपाणी ग्रिट रिमूव्हल चेंबरमध्ये वाहते. प्राथमिक प्रक्रिया (स्क्रीनिंग आणि ग्रिट रिमूव्हल) केल्यानंतर, गुरुत्वाकर्षणाद्वारे सांडपाणी एसबीआर बेसिनमध्ये निर्देशित केले जाते. एसबीआर बेसिनमध्ये एअर ब्लोअर, डिफ्यूझर्स, रिटर्न क्टिव्हेटेड स्लज (आरएएस) पंप, सरप्लस क्टिव्हेटेड स्लज (एसएएस) पंप, डिकेंटर, ऑटो १ व्हॉल्व्ह आणि प्रक्रिया चक्रांच्या स्वयंचलित नियंत्रणासाठी प्रोग्रामेबल लॉजिक कंट्रोलर (पीएलसी) सुसज्ज आहेत. या औद्योगिक भेटी करिता ४० विद्यार्थी आणि ४ प्राध्यापक सहभागी झाले होते.

## डॉ.बाबासाहेब ठोंबरे...

मान्यवरांच्या हस्ते व प्रमुख उपस्थितीत डॉ.ठोंबरे यांना 'मराठवाडा आयकॉन' हा प्रतिष्ठेचा सन्मान देऊन गौरविण्यात आले. डॉ.बाबासाहेब ठोंबरे यांचे पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र या महत्त्वाच्या कृषि क्षेत्राबरोबरच सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक तसेच पर्यावरण संवर्धन यासारख्या विविध क्षेत्रात सातत्यपूर्ण उल्लेखनीय, विधायक कार्य आहे. समाजहित व समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी समर्पित भावनेने कार्यरत असलेले एक अभ्यासू, मेहनती व्यक्तीमत्व म्हणून डॉ.ठोंबरे यांची राज्यासह देशात सर्वदूर ओळख आहे. 'वाळवंटातून सुद्धा स्वस्तिपद्मे रेखिती देखणी ती पाऊले जी ध्यासपंथे चालती..!' या सुप्रसिद्ध कवी बा.भ.बोरकरांच्या काव्यपंक्ती सार्थ ठरविणारे व्यक्तिमत्व म्हणजे डॉ.बाबासाहेब माणिकराव ठोंबरे हे होय. डॉ.ठोंबरे यांची एक शिस्तप्रिय, कार्यकुशल, कर्तव्यकठोर अधिकारी म्हणून ओळख आहे. सर्व वयोगटातील सहकार्यांना सोबत घेऊन जाण्याचे त्यांचे दृष्टे नेतृत्व व कौशल्य वाखाणण्याजोगे आहे. शिस्तप्रिय, एक उत्तम प्रशासक, समन्वयक, व्यवस्थापक म्हणून त्यांची सर्वदूर ख्याती आहे. बीड जिल्ह्यातील उंदरी (ता.केज) सारख्या आडवळणाच्या एका गावखेड्यात, एका सामान्य परंतु, कृतीशिल विचारांच्या शेतकऱ्याच्या घरी जन्मलेला एक युवक, आपल्या मनात दुर्दम्य इच्छाशक्ती आणि उरात एक ध्येय बाळगून, सोबत आई - वडिलांच्या संस्कारांची शिदोरी घेऊन शिक्षणासाठी बाहेर पडले. परभणीच्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातून कृषि पदवी घेऊन मुहूर्तमेढ रोवली व पुढे पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय या विषयात आचार्य पदवी घेऊन त्यावर गुढी उभारली. कृषि विद्यापीठात ३० वर्षांच्या सातत्यपूर्ण सेवेत त्यांनी पदांचे एकेक शिखर पादाक्रांत केले आहे. आज ते लातूर येथील कृषि महाविद्यालयाचे अधिष्ठाता या पदाची धुरा समर्थपणे पेलत आहेत. तत्पूर्वी ते कृषि महाविद्यालय, अंबाजोगाई येथे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य याच पदावर कार्यरत असताना त्यांनी अत्यंत उल्लेखनीय कार्य केले आहे. कृषि विद्यापीठाच्या शिक्षण, संशोधन आणि विस्तार कार्याबरोबरच त्यांनी महाविद्यालयात राबविलेल्या विविध उपक्रमांतर्गत वृक्ष लागवड, वृक्ष

पान ४ वरून पुढे...

संवर्धन, अटल घनवन वृक्ष लागवड, योगापार्क, ऑक्सिजन हब इत्यादी संकल्पना त्यांनी राबवल्या. परिसरात व गावशिवारात अत्यंत अल्पावधीत एकूण २ लक्ष विविध प्रजातींच्या वृक्षांची लागवड करून त्यांचे संवर्धन केले आहे. त्याचबरोबर कृषि महाविद्यालयासमोर अत्यंत देखणे आणि रमणीय (गार्डन) बगीचा निर्माण करून महाविद्यालयाची शोभा वृद्धिंगत केली आहे. संस्थेशी विविध क्षेत्रातील मान्यवर, तज्ज्ञ, विचारवंत, व्याख्याते, कवी, समाजसेवक यांचे वेळोवेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन घडवून संस्थेशी त्यांचे जिव्हाळ्याचे नाते जोडले व अंबाजोगाई येथील कृषि महाविद्यालय तसेच लातूर येथील कृषि महाविद्यालय खऱ्या अर्थाने लोकाभिमुख केले.

अशा मराठवाड्यातील विकासरत्नांच्या यशोगाथा आणि गौरव गाथा देण्याचा प्रयत्न नवराष्ट्रने सातत्याने केला. या सन्मानासाठी माझी निवड केल्याबद्दल नवभारत-नवराष्ट्र वृत्त समूहाचे जाहीर आभार.

## पोखरी ( घाट)...

मुलांच्या व कुस्तीपटुंच्या कुस्त्या झाल्या.मात्र त्यानंतर पुणे,कोल्हापूर,अकलुज,अहिल्यानगर, धाराशिव, छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याच्या विविध भागातील कुस्तीपटुंच्या आखाड्यात कुस्त्या झाल्या. १००० रूपये पासुन ३१,००० रूपयापर्यंत बक्षिसांची रक्कम ठेवण्यात आली होती. अंतिम लढत गणेश काळे मौलाली तालिम संघ भुम आणि कृष्णा पवार यांच्यात होऊन गणेश काळे विजयी झाले. त्यांचा स्मृती चिन्ह आणि ३१,००० रूपये रोख रक्कम देऊन सत्कार करण्यात आला.द्वितीय बक्षीस २५,००० रूपये बाळु बहिरवाल पाटोदा तालीम आणि तृतीय बक्षीस २१,००० रूपये मयुर कणसे आष्टी आणि संदिप लटके जामखेड या कुस्तीपटुंना विभागुन देण्यात आले. यावेळी पंचकमेटी म्हणून बाळासाहेब लेणे पुणे, गहिनीनाथ सिरसाट अहिल्यानगर, बाळासाहेब आवारे पाटोदा, दादासाहेब खिल्लारे आणि पोखरी (घाट) सरपंच बिभीषण मुळीक यांची उपस्थिती होती.कुस्ती बघण्यासाठी लिंबागणेश पंचक्रोशीतील कुस्तीप्रेमींनी तसेच लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. यावेळी महिलांची सुद्धा मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. दादासाहेब खिल्लारे यांनी कुस्त्यांच्या दंगलीसाठी केलेले चोख नियोजन, परंडा येथील लक्ष्मण जाधव यांच्या हलगीच्या तालावर पाहुण्यांचे फेटा बांधून स्वागत,कुस्तीपटुंची ओळख, कुस्तीचे मोसीन अत्तार बार्शी यांची धावती कॉमेंट्री,कुस्तीपटुंना आखाडा जाम होऊन दुखापत होऊ नये यासाठी अधुनमधून रोटर फिरवून कुस्तीचे मैदान भुसभुशीत करणे आदी गोष्टी नजरेत भरणा-या होत्या याचा प्रेक्षकांनी मनमुराद आनंद घेतला. लोकसहभागातून बांधण्यात आलेल्या शाळेप्रमाणेच ग्रामीण भागातील युवावर्ग व्यसनमुक्त होऊन मैदानी खेळाकडे वळावा, ग्रामीण भागातील कुस्तीपटुंना प्रोत्साहन मिळावे यासाठी दरवर्षी कुस्त्यांच्या दंगलीचे आयोजन करण्यात येणार असुन उत्तरोत्तर भव्यदिव्य स्वरूपात कुस्त्यांच्या दंगली भरवण्यात येणार असल्याचे आयोजक दादासाहेब खिल्लारे यांनी सांगितले.

## महाराष्ट्र दिनानिमित्त ...

करण्यात आले. या प्रसंगी विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाचे संचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख विजय देशमुख, प्रास्ताविक संतोष मेश्राम आणि आभार प्रदर्शन डब्ल्यू.एस. वाघमारे यांनी केले. या प्रसंगी विद्यालयाचे शिक्षक आर.बी. घुले,यु.बी. पवळ ,श्रीमती एन.जी. मुंडे, आनंद छात्रालयाचे अधीक्षक डी.व्ही.खरसाडे, एल.बी. हजारे,एस.एस. गायकवाड आणि भारत कोळेकर बहुसंख्य विद्यार्थी पालक नागरिक उपस्थित होते.

पान १ वरून पुढे...

## बीडमध्ये हवालदाराचा...

पाठवून कारवाई केली. यात एक जेसीबी व चालक पकडला होता. तर इतर चौघे फरार झाले होते. यात गोरख दिलीप काळे या वाळू माफियाचाही समावेश होता. पिंपळनेर पोलिसांनी याचा तपास करत असताना गोरख काळे याला पकडले. त्याचा मोबाईल जप्त केल्यानंतर त्यात कडूळे आणि काळे यांच्या संवादाच्या काही कॉल रेकॉर्डिंग सापडल्या. त्या जप्त करून त्याचा अहवाल पवार यांनी अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्फत पोलिस अधीक्षक नवनीत कॉंवत यांना पाठविला. त्यांची मंजूरी येताच कडूळे याला सह आरोपी करून शनिवारी अटक करण्यात आले. या प्रकाराने पुन्हा एकदा बीड पोलिस वादात सापडले आहेत.

## दोन रुपयांची...

तरी देखील अमन भाटिया यांनी हार मानली नाही. अमन भाटिया यांनी थेट सुप्रीम कोर्टात धाव घेतली. वर्षानुवर्षे प्रकरण सुरू होते. अखेर काल निकालाचा दिवस उजाडला. न्यायालयाने स्पष्ट शब्दांत सांगितलं की यात भ्रष्टाचार सिद्ध झालेला नाही. लाच मागितल्याचे आणि घेतल्याचे ठोस पुरावे देखील सापडले नाहीत. फक्त दोन रुपये जास्तीचे मागितले म्हणून आरोपीने जाणूनबुजून लाच मागितली असे मानता येणार नाही. न्यायालयाने एका महत्वाच्या प्रश्नाचेही उत्तर दिले. स्टँप वेंडरही पब्लिक सर्व्हंट मानले जातील. कारण ते एक प्रकारे सरकारचेच काम करत आहेत. या कामाचे सरकारकडून कमिशन घेतात. यामुळे स्टैप विक्रेत्यांवर प्रिवेंशन ऑफ करप्शन ॲक्ट लागू होतो. पण कायदा लागू होणे आणि शिक्षा मिळणे या दोन वेगळ्य गोष्टी आहेत. ठोस पुराव्याशिवाय कुणालाही दोषी धरता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. जोपर्यंत स्पष्ट होत नाही की या प्रकरणात आरोपीने जाणूनबुजून आणि बेकायदेशीर मार्गाने पैसे

पान १ वरून पुढे...

मागितले. तसेच त्यांच्याविरुद्ध ठोस पुरावे आणि असे कोणतेही वक्तव्य आढळले नाही ज्यावरून हे सिद्ध होईल की त्यांनी लाच मागितली. त्यामुळे अमन भाटिया यांची शिक्षा आणि त्यांच्यावरील दोष दोन्ही रद्द केले जात आहेत असे न्यायालयाने स्पष्ट केले.

## वंजारवाडीच्या मयत...

गावाजवळ हे पिकअप वाहन उलटले..दोन तीन पलट्या झाल्या या अपघातामध्ये.. अजित विठ्ठल महाजन वय १४ वर्षे, कु.श्रावणी विक्रम महाजन वय १३ वर्षे, आणि कु.ऋतुजा सतीश महाजन वय १६ वर्षे यांना जबर मार लागल्याने ते मयत झाले असून कु पल्लवी सतीश महाजन, शकुंतला सूर्यभान नरवडे, आशाबाई पोपट नरवडे, गीताबाई आजिनाथ नरवडे अर्चना नितीन नरवडे, कांताबाई ज्ञानदेव महाजन, स्वाती दिलीप महाजन, शांताबाई नरवडे, अंकिता बन्सी नरवडे, नंदा नितीन नरवडे, संगीता अशोक महाजन, आशाबाई बाळू महाजन, द्वारकाबाई बबन महाजन, वैष्णवी बाळू नरवडे, सुलाबाई पोपट महाजन, शीतल पोपट नरवडे, मनीषा शिवनाथ गोरे, धोंडाबाई नितीन नरवडे, सिंधुबाई ज्ञानदेव महाजन, श्रावणी दिलीप महाजन, आणि राजश्री विठ्ठल महाजन सर्व रा.वंजारवाडी ता.आष्टी जि.बीड हे जखमी झाले आहेत हे सर्व मजुरी करणाऱ्या वर्गातील ग्रामस्थ असून जबर जखमी झाल्यामुळे काम करता येणार नसल्यामुळे त्यांना आर्थिक अडचणी येणार आहेत..कामगार दिनी झालेल्या अपघातामधील मयत ३ व्यक्तींच्या वारस कुटुंबियांना आणि २० जखमी झालेल्या मजूर नागरिकांविषयी अत्यंत सहानुभूतीपूर्वक विचार होऊन त्यांना मुख्यमंत्री सहायता निधीद्वारे अर्थसहाय्य मंजूर करण्यात यावे..या साठी जिल्हाधिकारी,बीड यांच्या मार्फत प्रस्ताव सादर केला आहे. त्यानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कडे मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून अर्थसहाय्य मंजूर करावे अशी विनंती आ.सुरेश धस यांनी केली

पान १ वरून पुढे...

आहे.

## मुख्याधिकारी नीता...

नागरिकांना पिण्याचे मुबलक पाणी मिळत नसल्याने शहरात पाणीबानी असल्याचे चित्र दिसत आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांच्या सह मनसेचे शिष्टमंडळ कधीही हजर नसलेल्या नीता अंधारे यांच्या भेटीसाठी गेले असता तब्बल ११४ कोटी रुपयांची जलजीवन योजना जल जीवन विभागाकडे देण्यात आली असल्याचे म्हणत आपली जबाबदारी फक्त पाणी सोडण्याची आहे . या पलीकडे आम्ही काही करू शकत नाही पाणी न आल्यास आम्ही काहीच करू शकत नसल्याचे सांगत तुम्हाला लेखी स्वरूपात देते असल्याची उर्मट भाषा मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी वापरली. नीता अंधारे यांच्या विरोधात अनेक तक्रारी झाल्या आहेत मात्र मुख्याधिकाऱ्यांचे लाड कशामुळे पुरवले जात आहेत निष्क्रिय व भ्रष्टाचारी असलेल्या नीता अंधेरीची बदली करण्यासाठी नगर विकास मंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मुंबई येथे जाऊन भेट घेणार असल्याचे मनसेच्या वर्षाताई जगदाळे यांनी म्हटले आहे. बीड नगरपालिकेला आलेला कर व नळपट्टी घरपट्टी बांधकाम बनवण्यासाठी लागणारे पैसे हे कुठे जातात. दहा कोटी रुपयांचे टेंडर जिल्हाधिकारी रद्द केले यामागे नीता अंधारे ची बुद्धी होती आता पाण्यासाठी लोकांना त्रास देणाऱ्या या मुख्यअधिकारी नीता अंधारे यांना बीड शहरातून निलंबित करत अकलपट्टी करण्याची मागणी वर्षाताई जगदाळे यांनी केली असून. मुख्याधिकारी नीता अंधारे यांच्या विरोधात नगरपालिकेत पुन्हा बोंबाबोंब आंदोलन करणार असल्याचे वर्षाताई जगदाळे यांनी म्हटले आहे. वर्षाताई जगदाळे यांच्यासह महिला जिल्हाध्यक्ष आशाताई कुटे तथा शहराध्यक्ष अमरजान पठाण आदी मनसेचे पदाधिकारी उपस्थित होते.

पान १ वरून पुढे...

## लॉयन अशोक...

विभागातील सर्वोत्कृष्ट अध्यक्षतेच्या रजत पुरस्काराने गौरव नित करण्यात आले. जालन्यातील हॉटेल अमित येथे मंगळवारी ता,( २९) झालेल्या कार्यक्रमात विभागीय अध्यक्ष संजीव कुमार गुप्ता, माजी प्रांतपाल लॉ. विजयकुमार बगडिया माजी प्रांतपाल लॉ. पुरुषोत्तम जयपुरिया व नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पुरस्कार देऊन अशोक मिश्रा यांच्या सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन अशोक हूरगट व लॉ.पवन सेठिया यांनी केले तर लॉ. अशोक मिश्रा यांनी आभार मानले. यावेळी अशोक मिश्रा यांनी आपल्या सामाजिक कार्याबद्दल सांगितले की समाजासाठी ते खूप परिश्रम घेतले तसेच रेल्वे संघर्ष समिती, पत्रकारिता क्षेत्रांमध्ये करोना काळात लोकापर्यंत पोहोचून त्यांना आवश्यक औषधी,पोलिसांना पाण्याची बॉटल, गरिब (स्लम एरिया) अन्न धान्य देऊन त्यांच्या सहकार्य केले, सहकार्यासाठी महाराष्ट्राचे आरोग्य मंत्री राजेश टोपे यांच्या हस्ते संमती पत्र देऊन सन्मान करण्यात आला हे सर्व सामाजिक कार्य पाहून मला लायन्स क्लब मध्ये संधी मिळाली. लायन्स क्लब मध्ये आल्यानंतर मला अनेक मान्यवरांचे सहयोग लाभले त्यामध्ये माजी प्रांतपाल विजयकुमार बगडिया, माजी प्रांतपाल पुरुषोत्तम जयपुरिया ,अशोक जी हुंरगट, सुभाष चंद्र देविदान, रामकुमार जी अग्रवाल, नरेंद्रजी मोदी, सुनील बियाणे यांचे सहयोग भेटले. यावेळी लॉ.ज्ञानदेव पायगव्हाणे ,ला. लक्ष्मीकांत कंकाळ, लॉ.राजेश कामड, रामकुमार अग्रवाल ,अरुण मित्तल, राजेश , लुनिया , गेंदालाल झुंगे,किशोर गुप्ता ,महिंद्र कुमार पीती ,डॉक्टर राधेश्याम जयस्वाल, केदार करवा ,मनोज कर्नावट, मीनाक्षी दाड, जयश्रीलड्डा, सौ गुप्ता,सौ. सुषमा पायगावणे, सौ अशा बागडिया, सौ करणावत,सौ चांडक यांची उपस्थिती होती, पुरस्कार मिळाल्याबद्दल पदाधिकारी व सदस्यांनी लॉयन अशोक मिश्रा यांचे अभिनंदन केले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# पालखी मार्गातील मळेकरवाडी घाटाचे काम अखेर सुरु

## पैठण-पंढरपूर महामार्गासाठी खा.बजरंग सोनवणे यांचा पाठपुरावा फळाला

**बीड । प्रतिनिधी**

पैठण-पंढरपूर राष्ट्रीय महामार्गातील डोंगरकिन्ही ते चुंबळीमधील मळेकरवाडी घाटातील रस्त्याचा प्रश्न गेल्या दहा बारा वर्षांपासून प्रलंबित आहे. हा प्रश्न सुटावा यासाठी खा. बजरंग सोनवणे यांनी निवडणूकीचा निकाल लागताच पहिल्या बैठकीत हा प्रश्न निकाली काढण्यासाठी चर्चा केली होती. शिवाय मुंबईत संबधित विभागात बैठक घेतली होती. यानंतर आता अखेर घाटाचे काम सुरू झाले आहे.

पैठण-पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील पाटोदा तालुक्यामधे डोंगरकिन्ही ते चुंभळीमधील मळेकरवाडी घाटातील रस्त्याचा प्रश्न गेल्या १०-१२ वर्षांपासून प्रलंबित होता. घाटातील हा रस्ता वन्यजीव विभागाच्या भूमिकेमुळे बंद पडला होता. त्यामुळे डोंगरकिन्ही ते पाटोदा वाहतुक पूर्णपणे बंद पडली होती. अनेकदा या घाटात अपघातही घडले होते. खा. बजरंग सोनवणे यांनी निवडणूकीचा निकाल लागल्यानंतर तातडीने दि.१८ जून २४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयामधे झालेल्या राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या बैठकीमधे हा रस्ता चालू करण्यासाठी आवश्यक सूचना देण्यात आल्या होत्या. याचबरोबर मुंबई येथे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे विभागीय अधिकारी प्रशांत फेगडे यांचे कार्यालयामधे झालेल्या



बैठकीमधे पावसाळ्यापूर्वी या लांबीमधे डांबरीकरण करुन रस्ता वाहतुक सुरळीत करुन देण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार दि.३ मे रोजी डांबरीकरणाच्या कामास प्रत्यक्ष सुरुवात झालेली आहे. लोकसभा निवडणूकीचा निकाल लागल्यानंतर हारतुरे सत्कार घेत न बसता खा.बजरंग सोनवणे यांनी रेल्वे विभाग आणि राष्ट्रीय महामार्ग अधिकाऱ्यांची बैठक घेतली होती.

या बैठकीत प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावावेत, काही अडचणी असतील तर त्या सोडविण्यासाठी आपण प्रयत्न करू, निधीसाठी संबधित मंत्र्यांना भेटू, असेही म्हटले होते. यानंतर केवळ आश्वासन न देता त्यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या अनेकादा भेटी देखील घेतल्या. शिवाय मुंबई येथे राष्ट्रीय महामार्ग कार्यालयात बैठक घेवून पावसाळ्यापूर्वी मळेकरवाडी रस्त्याचे काम करण्याच्या सुचना दिल्या होत्या. यानूसार आता कामकाज सुरू झाले असून जिल्ह्यातील नागरिकांनी याबद्दल खा. बजरंग सोनवणे यांचे आभार मानले आहेत.

# ग्रामीण रुग्णालयात कुटुंब कल्याण व सामान्य शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

येथील ग्रामीण रुग्णालयाच्यावतीने दि.६ मे २०२५ रोजी भव्य बिनटाका कुटुंब कल्याण व सामान्य शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे ग्रामीण भागातील रुग्णांना मोफत व दर्जेदार शस्त्रक्रिया सेवा उपलब्ध करून देणे, तसेच रुग्णालयात



पूर्वीप्रमाणे सिझेरियन व इतर शस्त्रक्रिया नियमित सुरू करून प्रसूती रेफरलचे प्रमाण कमी करणे असून या शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने करण्यात आले आहे. आयोजित शिबिरात पुरुष व महिला कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया, शरीरावरील गाठी काढने, हर्निया, अपेंडिक्स व अन्य लहान स्वरूपाच्या शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत या सर्व शस्त्रक्रियांकरिता कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. शस्त्रक्रियेसाठी आवश्यक तपासण्या, औषधे, हॉस्पिटलायझेशन व इतर सुविधा पूर्णत मोफत असतील. या शिबिरासाठी पूर्वनोंदणी अत्यावश्यक असून, नोंदणी दि. ५ मे २०२५ रोजी केली जाणार आहे. नोंदणीवेळी रक्त, लघवी व इतर अत्यावश्यक तपासण्या करणे बंधनकारक असेल, जेणेकरून शस्त्रक्रियेसाठी निवड प्रक्रियेत सुलभता राहील. शिबिराचे उद्घाटन आ. प्रकाश सोळंके यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून बीड जिल्ह्याचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राऊत व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंडाळ हे शिबिराला मार्गदर्शनासाठी उपस्थित राहणार आहेत. त्यांच्यासोबत आरोग्य विभागाचे अधिकारी, डॉक्टर, तज्ञ सर्जन व इतर आरोग्य कर्मचारी देखील उपस्थित राहतील ग्रामीण व उपनगरातील नागरिकांना वेळेवर व योग्य वैद्यकीय उपचार मिळावेत, यासाठी राज्य शासन व आरोग्य विभाग सातत्याने विविध आरोग्यविषयक उपक्रम राबवत आहेत. त्या पार्श्वभूमीवर हे शिबिर एक महत्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. या शिबिरामुळे अनेक गरीब व गरजू रुग्णांना मोफत उपचार मिळतील आणि त्यांना शहरातील महागड्या रुग्णालयात जाण्याची गरज भासणार नाही. या उपक्रमाचे आयोजन प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ. अनिल परदेशी व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शहाजी लोमटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. त्यांनी धारूर व परिसरातील नागरिकांना या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे तसेच नोंदणीसाठी संपर्क डॉ. परवेज शेख मोक्र (९८९०८९००२४) यांच्याशी संपर्क साधायचा आहे.

# महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस मुळे जात निहाय जनगणना झाली नाही : वसंत मुंडे

**परळी । प्रतिनिधी**

भारताचे काँग्रेस पक्षाचे माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळात सन २०१४ च्या पूर्वी देशामध्ये जातनिहाय जनगणना सर्व निकषाचे पालन करून करण्यात आली. जातीवादी बीजेपीच्या नेत्यांनी ज्या त्या राज्यातील भाजपा सरकारला आर एस एस चा विचारधाराच्या वरिष्ठ नेत्यांनी जातीनिहाय जनगणनेच्या मुद्देनिहाय डाटा देण्यासंदर्भात वेळ काढून धोरण नाची गुपित अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या त्यामध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी दिनांक १२जून २०१८ ला केंद्र सरकारकडे गुपित पत्र देऊन संपूर्ण आरक्षण रद्द करण्याचे डावपेच आरएसएस मार्फत भाजपच्या विचारधारेच्या सरकारला लेखी



सूचना देण्यात आल्याचा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला . भारत देशा मधील प्रत्येक राज्यात पशु पक्षाची गणना केली जाते पण जातनिहाय आरक्षणासंदर्भात केली जात नाही हे दुर्दैव आहे. जातनिहाय जनगणना देशात झाली तर ५० टक्के ची आठ रद्द करून ७०% च्या आसपास आरक्षण जाईल ही खरी जातिवादी नेत्यांना भीती आहे. ओबीसी एससी एसटी अल्पसंख्यांक मागासवर्गीय जर जातीनिहाय जनगणने शासनाच्या नियमानुसार मुद्देनिहाय जनगणना झाली तर जातीवादी सरकारचा अन्याय केलेल्या नेत्यावर राजकारणातून तडीपार केल्याशिवाय राहणार नाही म्हणून तर भाजपचे सरकारला धोका होऊ शकतो हा खरा डावपेच राजकीय आहे .काँग्रेसच्या काळात मनमोहन सिंग च्या नेतृत्वाखाली पाच हजार कोटी रुपये जनगणना करण्यासंदर्भात खर्च करून जातनिहाय जनगणना करताना सामाजिक शैक्षणिक आर्थिक मागासलेपणा च्या आधारावर वर्गीकरण करून जात निहाय जनगणना आर्थिक सर्वेक्षणा च्या नियमानुसार सर्व बाबी तपासून सर्व जाती धर्मातील वंचित आदिवासी मागासवर्गीय अल्पसंख्यांक ओबीसींना न्याय देण्याचा जातीनिहाय जनगणमध्ये प्रयत्न केला गेला परंतु २०१४ नंतर देशात व राज्यात आरएसएसच्या विचारधारेचे बीजेपी सरकार आल्यावर जातनिहाय जनगणना संदर्भात उच्च व सर्वच न्यायालयात वेगवेगळ्या मुद्द्याखाली याचिका दाखल करून दीड टक्क्याची त्रुटी काढून सरकारने आरक्षणासंदर्भात निर्णय झालेला असताना रद्द करण्यात चे आदेश शासन स्तरावर काढण्यात आले असून तसा पत्र व्यवहार शासनाकडून सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेला आहे . त्यामध्ये दिनांक १२ जून २०१८ ला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी केंद्र सरकारकडे गोपनीय पत्र देऊन जात निहाय जनगणनेला विरोध केल्याचा गंभीर आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला आहे.

# श्रीकांत शिनगारे यांचे बी डी एस परीक्षेत यश संपादन ; मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

येथील प्रतिष्ठित युवा उद्योजक तुकाराम शिनगारे यांने चि. डॉ. श्रीकांत तुकाराम शिनगारे यांने छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था डेंटल कॉलेज व हॉस्पिटल छत्रपती संभाजीनगर येथून बीडीएस(दंत रोग चिकित्सक) चे शिक्षण नुकतेच पूर्ण केले दि.०२ मे रोजी हॉस्पिटल छत्रपती संभाजी नगर येथे पार पडलेल्या पदवीदान समारंभात मान्यवरांच्या हस्ते बीडीएस ची पदवी प्रदान करण्यात आली. किल्ले धारूर शहरातील प्रतिष्ठित युवा उद्योजक तुकाराम शिनगारे यांचे ची.श्रीकांत



शिनगारे याने प्राथमिक व माध्यमिक शिक्षण जनता विद्यालय धारूर व बुवाजी पाटील येथून उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले लहानपणापासूनच डॉ. होण्याची जिद्द असल्याने महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केल्यानंतर नीट परीक्षेच्या माध्यमातून छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था डेंटल कॉलेज आणि हॉस्पिटल छत्रपती संभाजी नगर येथे २०१९ मधे प्रवेश मिळवला अभ्यासातील सातत्य राखत येथील बीडीएसचे शिक्षण प्रथम श्रेणीत पूर्ण केले दि.२ मे शुक्रवार रोजी महाविद्यालयाच्या पदवीदान समारंभवेळी मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली यावेळी श्रीकांत चे वडील धारूर शहरातील प्रतिष्ठित व्यापारी तुकाराम शिनगारे,आई प्रतिभा शिनगारे,भाऊ आर्यन शिनगारे महादेव शेळके,सुधाकर शेळके,अमोल गुरव व मित्रपरिवार उपस्थित होता पदवी प्राप्त केल्याबद्दल डॉक्टर श्रीकांत शिनगारे यांच्यावर धारूर शहरातील उद्योग, राजकीय, सामाजिक, क्षेत्रासह विविध क्षेत्रातील मान्यवराकडून श्रीकांतच्या यशाबद्दल कौतुक व शुभेच्छा वर्षाव होत आहे.

# श्री नारायण मा. व उच्च मा. विद्यालय येथे महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील आहेर चिंचोली येथे एक मे रोजी श्री नारायण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला . ध्वजारोहन मा. रामराव पवार यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमचे अध्यक्ष आणि प्रमुख पाहुण्याच्या हस्ते प्रतिमा पूजन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री महादेवराव काळे अण्णा होते . प्रमुख पाहुणे म्हणून पालक श्री रामराव पवार तसेच संस्थेचे सचिव तथा प्राचार्य अमोल काळे सर,



माजी मुख्याध्यापक विनायक ढास सर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अशोक घरत सर यांनी केले तर सूत्रसंचालन करपे सर यांनी केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री चव्हाण युवराज सर यांनी मानले.

इयत्ता पाचवी ते नववी व ११ वी कला व विज्ञान वर्गाचा निकाल घोषित करण्यात आला. उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना गुणपत्रक देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला श्री मस्के जी. बी, श्री इनकर बी .जे, श्री पौळ डी.बी, श्री शेख सर, श्री चौधरी पी. बी, श्री रकटे एन. पी ,सौ. भुतावळे बि. आर , श्री रकटे बी. आर , कदम एस .व्ही, पवार पी .एल, श्री मुरमुडे ए .एन यावेळी शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# श्री गुरु बंकट स्वामी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त सहा मे पासून नेकनूर मध्ये अवतरणार भक्तीची शक्ती

## बंकट स्वामी संस्थान करणार मुलींचे कन्यादान ; सप्ताहात चालणार २४ तास अन्नछत्र

**नेकनूर । प्रतिनिधी**

संत बंकट स्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथीनिमित्त भव्य अखंड हरिनाम सप्ताह दिनांक सहा वार मंगळवार रोजी सुरू होत आहे.



संतांची शिकवण ही सात्त्विकतेची असते, साधनेचा मार्ग दाखवणारे संत हे स्वतः साधना करत असल्याने त्यांची वाणी श्रवण करण्यासाठी भक्त आसुसलेला असतो. संतांच्या वाणीतील चैतन्य भक्ताला सांप्रत वातावरणात जगण्यासाठी, दैनंदिन जीवनात येणारी संकटांशी लढण्यासाठी ऊर्जा देते आणि भक्ताला साधनापथावर ठेवते. हे राजकीय सभेत मिळू शकत नाही; उलट तिथे स्वार्थ, लालसा, द्वेष अशा दुर्गुणांची वाढच होण्याची शक्यता असते. थोडक्यात म्हणजे 'मनुष्य जीवनाचे कल्याण हे साधना केल्याने होणार आहे', याविषयीचे अमूल्य ज्ञान संत देतात. जन्मोजन्मीची कर्मे, दोष अन् अहंकार दूर करण्याची गुरुकिल्लीच जणू ते देतात. हीच 'अध्यात्माची शक्ती आणि भक्तांची भक्ती', नेकनूर मध्ये श्री गुरु बंकट स्वामी महाराज यांच्या सप्ताहस पहावयास मिळणार आहे.

या सप्ताहामध्ये महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनकारांची कीर्तने, प्रवचने, संत कथा, संगीत भजन, भारुडे यासह समाज उपयोगी कार्य हाती घेण्यात आले आहे.

यामध्ये बंकट स्वामी संस्थांचे विश्वस्तांनी विवाह सोहळा आयोजित केला आहे.

# गोपाळराव बावणे यांचे हृदय विकाराने निधन

**बीड । प्रतिनिधी**

गोपाळराव बावणे ( तलाठी) विद्यानगर पश्चिम बीड यांना हृदय विकाराचा तीव्र झटका येऊन दुःखद निधन झाले. दि. २ मे रोजी भगवान बाबा प्रतिष्ठान या ठिकाणी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले या वेळी माजी आ. मा.सुनिल दादा धांडे , मा.बीड तालुका दूध संघाचे चेअरमन लिंबाजीराव झोडगे, प्रकाशराव सुस्कर, जिल्हा परिषद सदस्य भारत काळे , प्रा.जी.पी.शेळके , नितीन धांडे, वरवटी/आहेर धानोरा सरपंच बालासाहेब आबा इंगोले, डॉ.शिवाजी सानप,नगरसेवक भिमराव



वाघचौरे, नगरसेवक विलास विधाते, मराठा महासंघाचे विनोद आप्पा इंगोले, श्रीमंत गोतावळे, अरूण डोंगरे, घोलप मामा आदीनि या वेळी त्यांना श्रद्धांजली वाहिली.

**जाहीर प्रगटन**

**मा. विशाखा बी.पाटील ६वे सह. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नंबर ६६१/२०२५**

**केसरबाई लक्ष्मण मुळीक वि. विरूध्द निरंक**

अर्जदार - १. केसरबाई भ्र. लक्ष्मण मुळीक, वयः ७६ वर्षे, धंदा घरकाम, रा.पोखरी पो. लिंबागणेश ता. जि. बीड. आझाद नगर, शाहुनगर बीड. २. शाहु पि. लक्ष्मण मुळीक, वय: ४२ वर्षे, धंदा -शेती, रा.वरीलप्रमाणे बीड. ३. ज्ञानेश्वर पि. लक्ष्मण मुळीक, वय: ३१ वर्षे, धंदा -शेती, रा.वरीलप्रमाणे बीड.

विरुध्द

गैरअर्जदार- निरंक **मागणी : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत -लक्ष्मण पि. कृष्णा मुळीक यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **लक्ष्मण पि. कृष्णा मुळीक, मृत्यु दि. १७/०२/२०२५ रोजी डी. वाय. पाटील हॉस्पीटल, पिंपरी चिंचवड, हवेली पुणे** येथे मयत झालेले असून अर्जदार हा मयताचा भाऊ आहे. मयत लक्ष्मण पि. कृष्णा मुळीक, यांना अर्जदाराव्यतिरिक्त ईतर कुणीही वारस नाहीत, असे अर्जात नमुद आहे.

वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार **लक्ष्मण पि. कृष्णा मुळीक** हयांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहू मयत यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**(मार्फत- अँड ज्ञानेश्वर मस्के)**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

**शिक्का**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**मा. ॲड.अजित एम. देशमुख, लवाद अधिकारी, लवाद न्यायाधिकरण, बीड यांचे समोर**

लवाद न्यायाधिकरण कार्यालय, "मधुमीन", डॉ.हाटवटे बिल्डींग, प्रियदर्शनी बाल उद्यानच्या पश्चिमेस, राजीव गांधी चौक, नगर रोड, बीड ता.जि. बीड (मल्टिस्टेट को-ऑपरेटिव सोसायटीज ॲक्ट 2002 व अब्रिटेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये)

**जाहीर नोटीस / समन्स** दि. 02/05/2025

अर्जदार : ज्ञानाई अर्बन मल्टिपर्पज निधी लि. माजलगाव पत्ता : कंपनीचे मुख्य कार्यालय, टवानी कॉम्प्लेक्स, शॉप नं. 1, संभाजी चौक, माजलगाव ता. माजलगाव जि. बीड

**विरूद्ध — गैरअर्जदार**

1) लवाद अर्ज क्र. 01/2025 1. पांडुरंग रामभाऊ गोंडे रा. चिंचोटी पो. हरिशचंद्र पिंपरी ता. वडवणी जि. बीड 2. गणेश गोपीनाथ घुमरे रा. पिंपळादेवी पो. पिंपळनेर ता. जि. बीड 3. बाबुराव मच्छिंद्र आगे रा. देवडी पो. खळवट निमगाव ता. वडवणी जि. बीड

2) लवाद अर्ज क्र. 03/2025 1. ज्ञानेश्वर उत्तम कदम रा. नागडगाव पो. सांडस चिंचोली ता. माजलगाव जि. बीड 2. सुमंत विठ्ठल शेरकर 3. प्रकाश जिजाभाऊ चंदनशिव दोघे रा. सांडस चिंचोली ता. माजलगाव जि. बीड

3) लवाद अर्ज क्र. 05/2025 1. सुनिता लहु जाधव रा. हिवरा (बु) ता. माजलगाव जि. बीड 2. मंगलबाई रामेश्वर शिंदे रा. फुले नगर, माजलगाव ता. माजलगाव जि. बीड

4) लवाद अर्ज क्र. 06/2025 1. ज्ञानेश्वर रामभाऊ चंदनशिव रा. देवडी पो. खळवट निमगाव ता. वडवणी जि. बीड 2. पांडुरंग रामभाऊ गोंडे रा. चिंचोटी पो. हरिश्चंद्र पिंपरी ता. वडवणी जि. बीड 3. आसाराम शिवाजी नवगिरे रा. देवडी पो. खळवट निमगाव ता. वडवणी जि. बीड

( टीप : वरील प्रत्येक लवाद अर्जामध्ये क्र. 1 हे कर्जदार तर अन्य जामीनदार आहेत.)

या नोटीस द्वारे तुम्हा वरील सर्व गैरअर्जदारांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमच्या विरूद्ध वर नमुद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केले आहेत. सदर लवाद दाव्याच्या सुनावनी नोटीस आपना पैकी काहीनी घेऊन गैरहजर राहिलात. काहीनी नोटीस घेण्यास नकार दिला. तर काहींच्या नमुद पत्यावर नोटीस बजावण्यात आल्या आहेत / नाहीत. तसेच काहींच्या नोटीस तामील होत नाहीत. तरी सदर लवाद अर्जाच्या चौकशी कामी आपण दि. 30/05/2025 रोजी सकाळी 11 वा. या लवाद न्यायाधिकरण कार्यालयात तुम्ही अथवा तुमच्या वकीलांसह हजर रहावे. तुम्ही हजर न राहिल्यास या बाबत तुमचे काहीही म्हणने नाही असे समजून तुमच्या विरूद्ध लवाद अर्जाचा एकतर्फी हुकूम / आदेश करण्यात येईल. याची नोद घ्यावी. सदर जाहीर नोटीस / समन्स माझ्या सही व शिक्यांची दिले आहे.

ॲड.अजित एम. देशमुख
लवाद अधिकारी, बीड.

दैनिक
● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र



## पद्मपाणी राज्य, राष्ट्रीय पुरस्कार वितरण सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहा

**प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिलीप तरकसे यांचे आवाहन; आज होणार मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराचे थाटात वितरण**

**बीड । प्रतिनिधी**

शहरात मागील १७ वर्षापासून संविधान दिनाच्या अनुषंगाने विविध क्षेत्रात भरीव काम करणार्या गुणवंत व्यक्तींना पद्मपाणी प्रतिष्ठानच्या वतीने पद्मपाणि राष्ट्रीय, राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानीत केले जाते. या वर्षीच्या या पुरस्कारासाठी बीड जिल्ह्यासह राज्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून आपली आगळीवेगळी ओळख निर्माण करणार्या गुणवंत कर्तुत्ववान व्यक्तीच्या कार्याची दखल घेऊन प्रतिष्ठांच्या वतीने दिल्या जाणार्या विविध पुरस्कारांसाठी विविध क्षेत्रातील गुणवंत कर्तुत्ववान व्यक्तीची निवड करण्यात आली असून रविवार दि.०४ मे रोजी बीड शहरातील यशवंतराव चव्हाण ▶▶ उर्वरित पान २ वर



*अंबेजोगाई: दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरननाळे यांनी दैनिक विवेक सिद्धू कार्यालस भेट दिली या वेळी संपादक अभिजीत (गाठाळ )जगताप यांनी या वेळी सत्कार केला समवेत तनश्री नरनाळे.*

# NEET परीक्षेआधीच विद्यार्थ्यानं घरात गळफास घेऊन संपवलं आयुष्य

**बीड । प्रतिनिधी**

NEET परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्याने परीक्षा होण्यापूर्वीच आपल्या आयुष्याचा दोर कापला आहे. लातूरमधील राहत्या खोलीतच त्याने गळफास घेत आत्महत्या केली आहे. मृत विद्यार्थी गेले अनेक वर्ष कोचिंग क्लासमध्ये NEET परिक्षेची तयारी करत होता. मागच्या वेळी त्याला ५२० गुण मिळाले होते. मात्र तरीही त्याला वैद्यकीय प्रवेश मिळाला नव्हता. यंदाही तो NEETपरिक्षेची तयारी करत होता. पण परिक्षेच्या १ दिवस आधीच त्याने राहत्या खोलीत आत्महत्या केली. तरूणाने आत्महत्या का केली? याचा शोध पोलीस घेत आहेत.

अनिकेत अंकुश कानगुडे (वय वर्ष २०) असे मृत विद्यार्थ्याचे नाव आहे. तो मुळचा बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील रूई धानोर गावातील रहिवासी होता. तो मागील २ वर्षांपासून लातूरमधील आरसीसी कोचिंग क्लासेसमध्ये NEET परिक्षेची करत होता. यंदाही तो NEET परिक्षेची तयारी करत होता.





मागच्या परिक्षेत त्याला ५२० च्या जवळपास गुण मिळाले होते. मात्र, वैद्यकीय प्रवेश मिळालेला नव्हता. पुन्हा तो नीट परीक्षेची तयारी करत होता. पण परीक्षेच्या एक दिवस आधीच त्याने आपल्या आयुष्याची दोर कापली. अनिकेतने आपल्या राहत्या खोलीतच गळफास घेत आत्महत्या केली आहे. गळफास घेतल्यानंतर पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन रूग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवले. अनिकेतनं आत्महत्या का केली? आत्महत्या करण्यामागचं कारण काय? याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत. या घटनेनंतर कुटुंब आणि परिसरातून शोक व्यक्त होत आहे.

NEET २०२५ परीक्षेची जय्यत तयारी

वैद्यकीय प्रवेशासाठी घेण्यात येणारी नीट २०२५ परीक्षा येत्या ४ मे रोजी देशभर आयोजित करण्यात आली आहे. देशभरातून सुमारे २३ लाख विद्यार्थी या परीक्षेला सामोरे जाणार आहेत, तर लातूर जिल्ह्यातून तब्बल २०,८०९ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. ही परीक्षा राष्ट्रीय परीक्षा ▶▶ उर्वरित पान २ वर

# माल निघालाय पण भाव ढासळले ; बारदाणा, वाहतूक भांडं, पिशव्या भरायलाही परवडंना

**मुळुकवाडी येथील कांदा उत्पादक शेतकरी जालिंदर ढास यांची खंत : डॉ.गणेश ढवळे**

**लिंबागणेश। प्रतिनिधी**

गेल्या काही वर्षांत शेतकऱ्यांचा कांदा उत्पादनाकडे कल वाढला आहे .त्यामुळे खरीप, रब्बी हंगामात कांद्याकडे शेतकऱ्यांचा ओढा वाढला असुन दोनही ऋतुत कांदा लागवड करत आहेत.कांदा उत्पादनात वाढ झाली परंतु कांद्याला सद्यपरिस्थितीत भाव नसल्याने कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. भर उन्हाळ्यात कांदा काटणीला मजुर मिळत नाहीत.त्यातच उन्हाचा पारा ४० अंश सेल्सिअसच्यावर असताना शेतकरी कांदा काढणी करत आहेत. कांद्याला फेब्रुवारी



मध्ये प्रति किलो २०-३० रूपये बाजारभाव होता. तो टिकुन राहिल असे वाटत असतानाच बाजारभाव कमी होऊन ११ रुपये किलोवर आला आहे. कांदा उत्पादक शेतकरी ढासळलेल्या भावामुळे चिंतेत असुन भाडे वाहतुक,बारदाणा, पिशव्या भरायला सुद्धा परवडेना अशी खंत बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील शेतकरी जालिंदर सुर्यभान ढास यांनी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्याशी बोलुन दाखवली.

माल निघालाय पण भाव नाही; बारदाणा, वाहतूक खर्च, पिशव्या भरायला परवडंना :-जालिंदर सुर्यभान ढास ( कांदा उत्पादक शेतकरी मुळुकवाडी)

बीड तालुक्यातील कांदा उत्पादक गाव म्हणून ओळख असलेल्या मुळुकवाडी येथील शेतकऱ्यांना कांदा पिकाने साथ दिली नाही. मुळुकवाडी येथील कांदा उत्पादक शेतकरी जालिंदर सुर्यभान ढास यांनी यावेळी माल निघलाय पण भाव नाही,अडीच एकर कांदा लागवड केली होती. ▶▶ उर्वरित पान २ वर

# भक्तांचा सांभाळ व दुष्टांचा संहार करण्यासाठी भगवंत अवतार घेतात

**▸ कथा प्रवक्त्या साक्षी ताई करडकर**

**बीड । प्रतिनिधी**

या भूतलावरील आपल्या भक्ताचे रक्षण करण्यासाठी आणि दुष्टांचा संहार करण्यासाठी भगवंत अवतार घेतात. भगवान श्री कृष्णाने अवतार घेऊन गोकुळातील गाई, गोपाळ, गोपिका यांचा सांभाळ केला तर दुष्ट प्रवतीच्या राक्षसांना सायुजता मोक्ष दिला असे सांगितले. काल विजय नगर येथील भुवनेश्वर संस्थांचे शिव उपासक महंत बाळनाथ महाराज डीसले यांच्या मार्गदर्शनाने ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे बाबा यांच्याआशिर्वादाने





विजय नगर येथे अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथा ज्ञान यज्ञ सोहळा आयोजित केलेला आहे. काल या कथेमध्ये ध्रुव बाळ कथा, राम अवतार कथाभाग झाला,या बरोबरच ▶▶ उर्वरित पान २ वर

# आदित्य पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांची सिवेज ट्रीटमेंट प्लांट कांचनवाडीला भेट

**▸ सांडपाणी प्रक्रिया करण्याच्या आधुनिक कार्यक्षम पद्धतीबद्दल घेतली माहिती**

**बीड । प्रतिनिधी**

आदित्य पॉलिटेक्निक च्या विद्यार्थांना सिवेज ट्रीटमेंट प्लांट कांचनवाडी, छत्रपती संभाजीनगर येथे शैक्षणिक भेट दिली. यावेळी जलजन्य रोगांचा प्रसार रोखून सार्वजनिक आरोग्याचे रक्षण करण्यात एसटीपीची काय भूमिका आहे. प्रक्रिया न केलेल्या



सांडपाण्यामुळे समुदाय आणि परिसंस्थांवर काय परिणाम होतात. हे विद्यार्थी समजून घेतले. पाण्याची गुणवत्ता व्यवस्थापन आणि प्रक्रिया या बद्दल विद्यार्थ्यांनी सविस्तर माहिती घेतली.

आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी च्या कार्यकारी सदस्या ▶▶ उर्वरित पान २ वर

# डॉ.बाबासाहेब ठोंबरे 'मराठवाडा आयकॉन'ने सन्मानित; सर्वस्तरांतून डॉ.ठोंबरे यांच्या निवडीचे स्वागत

**लातूर । प्रतिनिधी**

मराठवाडा विभागातील लातूर व बीड जिल्ह्यात प्राधान्याने कृषि संस्कृतीशी निगडित असलेल्या पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र या महत्त्वाच्या क्षेत्रात केलेले उल्लेखनीय कार्य तसेच पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने मोठे आणि व्यापक प्रमाणात केलेली वृक्ष लागवड तसेच वृक्ष संवर्धनाची सातत्यपूर्ण व अखंडितपणे केलेली यशस्वी कामगिरी या कृषि व पर्यावरणातील



बहुमोल कार्याची दखल घेऊन, कृषि महाविद्यालय लातूरचे अधिष्ठाता व विलासराव देशमुख कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय लातूरचे अधिष्ठाता डॉ.बाबासाहेब ठोंबरे यांना शनिवारी मध्य आणि पश्चिम भारतातील सर्वांत मोठे माध्यम समूह असलेल्या नवभारत - नवराष्ट्र यांच्या वतीने दिला जाणारा 'मराठवाडा आयकॉन'ने एका विशेष सन्मान सोहळ्यात सन्मानित करण्यात आले. डॉ. ठोंबरे यांच्या निवडीचे सर्वस्तरांतून स्वागत होत आहे.

शनिवार, दिनांक ३ मे रोजी छत्रपती संभाजीनगर येथील हॉटेल अजंता म्बेसिडर या अलिशान हॉटेलच्या सभागृहात आयोजित या विशेष सन्मान सोहळ्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री ना.संजयजी शिरसाठ, इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा मंत्री ना.अतुलजी सावे, आमदार विक्रमजी काळे, नवभारत वृत्त समूहाचे ग्रुप प्रेसिडेंट ए.श्रीनिवास, छत्रपती संभाजीनगर महानगर पालिका आयुक्त जि.श्रीकांत या ▶▶ उर्वरित पान २ वर

# पोखरी ( घाट) गावात रंगलेल्या निकाली कुस्त्यांच्या दंगलीने कुस्तीप्रेमींची मने जिंकली

**लिंबागणेश। प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील पोखरी ( घाट) गावात दि.०२. शुक्रवार रोजी निकाली कुस्त्यांची दंगल लोकसहभागातून बांधण्यात आलेल्या जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणातील मैदानात कुस्त्यांची दंगल पार पडली. बीडचे खा.बजरंग बप्पा सोनावणे, बीड जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट राजेंद्र मस्के, बंकटस्वामी मठाधिपती ह.भ.प. लक्ष्मण मेंगडे महाराज,बेलेश्वर







संस्थान मठाधिपती शांती ब्रम्ह तुकाराम महाराज,चोरमले महाराज यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून कुस्ती दंगलीस प्रारंभ झाला.प्रारंभी लहान ▶▶ उर्वरित पान २ वर

## महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहण कार्यक्रम डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहण कार्यक्रम आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेचे अध्यक्ष बी.एस.धुतालमल यांच्या शुभहस्ते आणि सचिव अँड. व्ही.बी. मगर, सर्व संचालक आणि मुख्याध्यापक तथा महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ सदस्य बी.ए. हावळे यांच्या मुख्य उपस्थितीमध्ये महाराष्ट्र गीताच्या सामुदायिक गीत गायनाच्या सुरांमध्ये झाली. या कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा गांधी, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महाराष्ट्राचे प्रथम मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते ▶▶ उर्वरित पान २ वर



